आधुनिक विचारांचे
# वर्तमान



### ओमिक्रोनचे टेन्शन घेवू नका : टोपे

जालना : ओमिक्रोनची अजून आपल्या राज्याला कुठलीच भीती नाही, कारण कुठल्याही भागात लागण झाल्याचे दिसत नाही. आज त्याची चिंता बाळगण्याची गरज नसली तरी काळजी घेणे आवश्यक आहे. 'ओमिक्रोनचे टेन्शन घेवू नका, मात्र काळजी घ्या' अशी भावनिक साद देत शाळा एक डिसेंबरला ठरल्याप्रमाणेच सुरू होतील असे टोपे यांनी स्पष्ट केले.

बीड । मंगळवार, ३० नोव्हेंबर २०२१ । वर्ष : ४ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : ५ । पाने : ४ । मूल्य २ ₹

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# पक्षाकडून कसलीच अपेक्षा नाही!

## विधान परिषदेची संधी हुकल्यानंतर पंकजा मुंडेंनी मौन सोडले



प्रतिनिधी

मुंबई : आपण भाजपात नाराज नाही किंवा पक्षाकडून पदाची कसलीच अपेक्षा नाही, अशी स्पष्टोक्ती भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी दिली. त्या विधान परिषदेची संधी हुकल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलत होत्या.


भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे पक्षावर नाराज असल्याची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. विधान परिषदेत पंकजा मुंडे यांना डावलल्यामुळे चर्चांना अधिक जोर आला. दरम्यान, या चर्चावर पंकजा मुंडे यांनी प्रसार माध्यमांशी भाष्य केले. ओबीसी आरक्षण, एसटी कर्मचाऱ्यांचा संप यावरुन पंकजा मुंडे यांनी राज्य सरकारवर तोफ डागली होती. यावेळी पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेच्या उमेदवारी बाबत विचारलं असता त्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. भाजपने विधान परिषदेसाठी चार उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली आहे. मात्र, यावेळीही पंकजा मुंडे यांना डावलण्यात आल्याने त्या नाराज असल्याची चर्चा होती. मात्र, पंकजा यांनी माध्यमांशी बोलताना या चर्चा फेटाळून लावल्या होत्या. मला कसलीही अपेक्षा नाही. पदामुळे परिणाम होईल असे वाटत नाही. माझे काम सुरु आहे. मी राज्यभर फिरत आहे, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. राज्यात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर आलेल्या सरकारने जनतेच्या हिताच्या मुद्द्यांवर मार्गक्रमण करायला हवं होतं. पण असे कुठेही होताना दिसत नाही. राज्यातील बहुजन, ओबीसींना अंधकारात लोटणारा निर्णय, अर्थात ओबीसींचे आरक्षण रद्द होण्याचा निर्णय या सरकारच्या काळात झाला. ओबीसी आरक्षण स्थगित झाल्यानंतर रद्द होईपर्यंतच्या कालावधीत राज्य सरकारने पावले उचलली असती, तर ओबीसींचे आरक्षण वाचले असते, अशा शब्दांत पंकजा मुंडे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.

### एसटी संपावरुन सरकारवर टीकास्त्र

एसटी कर्मचाऱ्यांचा संप गंभीर आहे. मी देखील एसटी कर्मचाऱ्यांची भेट घेतली. मात्र, सरकारने अजूनही तोडगा काढत नाही. काही निर्णय घेणे नक्कीच कठीण आहे. पण, संभाषणाने मार्ग निघू शकतो. पण, सरकार संभाषण करायला तयार नाही, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### विनायक मेटेंचा सरकारवर हल्लाबोल



बीड : महाविकास आघाडी सरकारला दोन वर्षे झाले आहेत. दोन वर्षात या सरकारला सर्वच ठिकाणी अपयश आले आहे. भ्रष्टाचार करण्यामध्ये यांना मोठ्या प्रमाणात यश आले आहे. हे सरकार आल्यापासून महाराष्ट्रावर जी संकटे आली आहेत ते आजतागायत संपण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे हे सरकार आणताना शरद पवारांनी कोणत्या पंडितांचा सल्ला किंवा मुहूर्त बघितला नव्हता असे वाटते आहे. म्हणूनच हे सरकार पालथ्या पायाचे आहे की काय असा प्रश्न महाराष्ट्रापुढे पडल्याची टीका आ.विनायक मेटे यांनी केली आहे.

### माजलगाव तालुक्यात वाळूमाफियांचा उच्छाद

माजलगाव : तालुक्यातील सादोळा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूचा उपसा करून साठा केला जात असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक पदाचा अधिकारी संबंधित ठिकाणी छापेमारी करून माफियांच्या मुसक्या बांधण्याहेतू गेला असता संबंधित पोलीस निरीक्षकास राजकीय दबाव आल्याने कारवाई न करता त्यांना परतावे लागल्याची विश्वसनीय माहिती हाती येत असून संबंधित अधिकारी कारवाई न करता परत गेल्यानंतर काही स्थानिकांनी थेट माध्यम प्रतिनिधींना वाळु साठ्याचे छायाचित्रे पाठवून घडलेल्या घटनेचे कथन केले. याची गंभीर दखल जिल्हाधिकाऱ्यांनी घेऊन सादोळ्यातील वाळु साठे ताब्यात घ्यावेत, असे आवाहन स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### महावितरणची मनमानीला अगरबत्तीचे 'उत्तर'

बीड : महावितरण कंपनीची मनमानी चालू असून आजपर्यंत लाक्षणिक उपोषण तहसिलदार कार्यालय आष्टीसह रस्ता रोको आंदोलन धानोरा येथे करून सुद्धा महावितरण आपलीच हुकमी राजवट गाजवत असून आंदोलनात दिलेला शब्द पाळत नसल्यामुळे संपूर्ण आष्टी तालुक्यातील शेतकरी बांधवांचा विद्युत पुरवठा खंडित केला. महावितरणकडून ८ हजार रूपये प्रति कनेक्शन भरणा करून घेत असलेल्या निषेधार्थ सोमवारी दि.२९ नोव्हेंबर रोजी महावितरण कार्यालयाला हार अगरबत्ती हळदकुंकू सह श्रीफळ फोडून पूजन करून गांधीगिरी मार्गाने उपअभियंता कार्यालयात आष्टी ते तहसिल कार्यालयापर्यंत सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर रामचंद्र घोडके यांच्यासह शेतकऱ्यांनी लोटांगण घेत आंदोलन केले, झुंबर महाराज बोडखे सह शेतकरी, लोटांगण समवी उपस्थित होते.

### एसटी कर्मचाऱ्यांकडून नियमावलीचे पालन

बीड : कोरोनाच्या नव्या व्हेरियंटने जगाची चिंता वाढवलीय, अशातच विलीनीकरणाच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांचे आंदोलन देखील मोठ्या संख्येने सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात शासनाने लावून दिलेल्या नव्या नियमावलीचे पालन होत असल्याचे चित्र बीड आगारात दिसून आले आहे.

# पात्रुडच्या सर्वांगीण विकासासाठी यापुढेही भरीव निधी आणणार

## आमदार प्रकाश सोळंके यांची ग्वाही; भव्य ग्रामपंचायत वास्तूचे लोकार्पण

प्रतिनिधी

माजलगाव : ग्रामीण विकासासाठी सर्वोच्च प्राधान्य देत पात्रुड येथील ग्रामपंचायत इमारतीला एक कोटींचा निधी दिला. विक्रमी कालावधीत पात्रुड ग्रामपंचायतीची नवीन वास्तू निर्माण झाली. यापुढेही पात्रुडसाठी भरीव निधी देवू, असे आश्वासन आमदार प्रकाश सोळंके यांनी दिले. ते रविवारी पात्रुड येथील ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित होते. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, जिल्हा परिषदेचे सभापती कल्याण आबुज, जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत शेजुळ, पंचायत समितीचे सभापती भागवतराव खुळे, उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, जयदत्त नरवडे, पात्रुड ग्रामपंचायतचे सरपंच अॅड.कजिम मनसबदार, उपसरपंच शेख युसुफ आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, पात्रुड ग्रामपंचायतीच्या भव्य दिव्य इमारतीमुळे गावाच्या वैभवात निश्चित भर पडली आहे. अतिशय देखणी आणि सुरेख इमारत उभी राहिली आहे. याचा ग्रामस्थांनी लाभ घ्यावा, विकासाला चालना देण्यासाठी ग्रामपातळीवर इमारती उभ्या राहणे गरजेचे आहे. राजकारण्यांनी सामाजिक प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज आहे, असेही आवाहन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले आहे.







### आ.प्रकाश सोळंके विकास खेचून आणणारे लोकप्रतिनिधी : अमरसिंह पंडित

पात्रुड ग्रामपंचायतीच्या नवीन वास्तूमुळे गावाचे वेगळेपण दिसत आहे. या भागाचे आमदार प्रकाश सोळंके दूरदृष्टी असणारे विकासाभिमुख नेतृत्व आहे. सोळंकेंच्या पाठीशी पात्रुड ग्रामस्थ एका दिलाने उभे असतात, ही आनंदाची बाब आहे. विकास खेचून आणणारा आमदार म्हणून प्रकाश सोळंके यांची ओळख आहे, असे गौरवोद्गार उद्घाटन कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी काढले.

### सेवानिवृत्तीचा गौरव



माजलगाव : सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक गणेश सोळंके यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करतान मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार प्रकाश सोळंके समवेत अॅड.भानुदास डक आदी.

## संदीप चव्हाणच्या जाण्याने मित्र परिवारावर शोककळा

प्रतिनिधी



माजलगाव : तरुणाईच्या गळ्यातील ताईत बनत चाललेला तरुण संदीप चव्हाणच्या अपघाती निधनाने मित्र परिवारावर शोककळा पसरली आहे. मितभाषी आणि नम्र स्वभावाच्या संदीपच्या जाण्याने माजलगाव तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

सदरील घटना रविवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या केसापुरी कॅम्प येथे एका मंगल कार्यालयात मित्राच्या हळदीच्या कार्यक्रमाला तिघे मित्र दुचाकीवरून जात होते. माजलगाव धरणाच्या कमानीसमोर असलेल्या दुभाजकाला दुचाकी धडकली. या अपघातात संदीप अंकुश चव्हाण याच्या डोक्याला मार लागल्याने तो जागीच ठार झाला. तर त्याच्यासोबत असलेले मित्र संकेत सखाराम परसे व प्रशांत रमेश सोळंके यांना देखिल मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले. या दोघांवर ग्रामीण रूग्णालयात उपचार करण्यात आले. अपघातातील मृत व जखमी असे तिघेही येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात काम करणाया कर्मचाऱ्यांची असल्याचे सांगण्यात येत आहे. तर मृत संदीप याचे लग्न एक महिन्यापूर्वीच झाले होते. चव्हाण कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# मराठी 'गोदावरी'चा इफ्फीत विशेष सन्मान

## 'रिंग वाँडरिंग' चित्रपटाला सुवर्ण मयूर; गोव्यात इफ्फीचा शानदार समारोप

भगीरथ तोडकरी

पणजी : ५२ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीचा गोव्याची राजधानी पणजी येथे शानदार समारोप झाला. मराठी गोदावरी चित्रपटाला रौप्य मयूर सन्मान प्रदान करण्यात आला. तर 'रिंग वाँडरिंग' चित्रपटाला सुवर्ण मयूर देवून गौरविण्यात आले.

गोव्यात सुरू असलेल्या ५२ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा रविवारी थाटात समारोप झाला. जपानी चित्रपट 'रिंग वाँडरिंग'ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा सुवर्ण मयूर सन्मान जाहीर झाला. ४० लाख व प्रशस्तीपत्र असे याचे स्वरुप आहे. तर मराठी अभिनेते जितेंद्र जोशी यांना 'गोदावरी' या चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून रौप्य मयूर सन्मान प्रदान करण्यात आला. झेक प्रजासत्ताकचे वाक्लाव कादांका यांना 'सेव्हिंग वन हू इज डेड' या चित्रपटासाठी उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून सन्मानित केले. सोहळ्याला केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत, अभिनेत्री माधुरी दीक्षित, अभिनेता मनोज वाजपेयी, रणधीर कपूर, प्रसून जोशी, केंद्रीयमंत्री श्रीपाद नाईक, गोवा मनोरंजन संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष फळदेसाई, 'इफ्फी'चे संचालक चैतन्य प्रसाद उपस्थित होते. रशियन दिग्दर्शक रोमन वास्यानोव्ह यांच्या 'द डॉर्म'ला देशातील गुंतागुंत व भ्रष्ट समाजाच्या कथनासाठी विशेष ज्युरी उल्लेखनीय चित्रपट म्हणून गौरव. धर्म आणि व्हसाहत वादावर प्रकाश टाकणारा दिग्दर्शक मारी अलेसँद्रिनीचा 'झाहोरी'हा इफ्फीतील सर्वोत्कृष्ट पदार्पण चित्रपट ठरला. पदार्पणातील दिग्दर्शनासाठी सायमन फॅरिओल्च्या 'द वेल्थ ऑफ द वर्ल्ड' या स्पॅनिश चित्रपटाला स्पर्धा श्रेणीत विशेष उल्लेखनीय चित्रपट पुरस्कार देण्यात आला आहे.


### विदेशी तारका ठरल्या 'सर्वोत्कृष्ट'

स्पॅनिश अभिनेत्री अँजेला मोलिना विशेष ज्युरी पुरस्कार, मराठी दिग्दर्शक निखिल महाजन (चित्रपट - गोदावरी), ब्राझिलियन अभिनेत्री रेनाटा कालो (चित्रपट - द फर्स्ट फॉलन)







वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

## संपादकीय

# नात्यांचा अनुबंध जपताना...

काळाच्या ओघात नातेसंबंध दुरावताना दिसत आहेत. अशावेळी नात्यांचा ओलावा जपून ठेवण्यासाठी सर्वांनी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. आपले कुटुंब सावरणे, सांभाळणे, हितसंबंध वृद्धिंगत करणे यासाठी कसे प्रयत्न करावेत, यावर ऊहापोह करणार आहोत. आपल्या कुटुंबातील, घरातील जे जे नातेसंबंध दुरावलेले आहेत, मनाने अथवा शरीराने लांब गेलेले आहेत, नोकरी अथवा व्यावसायिक कारणाने अन्य ठिकाणी स्थलांतरित झालेले आहेत किंवा कौटुंबिक कलह, भांडण यामुळे अबोला धरलेले आहेत, त्या नात्यांना नवसंजीवनी देऊयात. सुरुवात करूयात पती-पत्नीच्या नात्यापासून! संपूर्ण कुटुंबाला तोलून धरणे, सर्व नात्यांना जबाबदारीने सांभाळून सगळ्यांना आपलंस करणे ही ताकद या पती-पत्नीच्या नात्यात आहे. समाजात अशी अनेक जोडपी असतील, ज्यांच्यामध्ये कोणत्या ना कोणत्या कारणास्तव दुरावा आलेला आहे. ते एकमेकांपासून लांब राहत आहेत, काही कारणास्तव त्यांच्यात गैरसमज झालेले आहेत, वादविवाद झालेले आहेत किंवा काही अपरिहार्य कारणामुळे वेगळे होण्याच्या देखील तयारीत आहेत. गरज आहे ती, तुटत चाललेले; परंतु पूर्णपणे न तुटलेले नातेसंबंध वाचवण्याची नात्याची विझत चाललेली पणती पुन्हा प्रज्वलित करण्याची एकमेकांमध्ये असलेले भांडण, क्लेश, गैरसमज संपवून, स्वतःचा इगो बाजूला ठेऊन आपल्याकडून पहिलं पाऊल टाकण्याची थोडी माघार घेऊन इतरांना मोठेपणा देण्याची हे ठरवण्याची की, इथून पुढे कुटुंबातील कोणालाही दुखावणार नाही, वाईट बोलणार नाही, कोणाची निंदा करणार नाही तू तू आणि मी मी करण्यापेक्षा आपलं म्हणून सगळ्यांना स्वीकारण्याची आम्ही-तुम्ही म्हणून घरात अधिक फूट पडण्यापेक्षा आपण म्हणून एकत्र येण्याची...स्वतः पुढे व्हा बायको रागावून माहेरी आहे तिला भेटायला जा; बहीण बोलत नाहीये स्वतः फोन करा; भाऊ माघार घेत नाहीये तुम्ही नमते घ्या; आई-वडील दुरावलेले आहेत, त्यांना जवळ आणा; मित्र-मैत्रिणींना भेटायला जा, शेजाऱ्यांना आपल्या घरी बोलवा, घरातील बालगोपालांना नातं जोडणे शिकवा, तोडणं नाही! त्यानं असं वागावं, तिने तसं करावं, याने असं बोलावं, त्यांनी इकडे यावं, यांनी तिकडे जावं, तो स्वतःला काय समजतो, ती स्वतःचा स्वाभिमान धरून ठेवते, हा बोलत नाही, तो फोन करत नाही, याला माझी किंमत नाही, ही स्वार्थी, तो मतलबी, याने धोका दिला, त्याने माझा गैरफायदा घेतला, यांनी मला फसवलं आणि त्यानं मला बरबाद केलं हेच आणि हेच विचार जर आपण अंतर्मनात करत असू आणि स्वतः परिस्थिती सुधारण्यासाठी कोणतेही सकारात्मक पाऊल टाकत नसू, तर कुटुंबव्यवस्था टिकणे, कुटुंबातील सदस्य जवळ येणे अशक्य आहे. आपल्यातला मीपणा, खोटा अहंकार स्वतःबद्दलची भ्रामक कल्पना सोडून देण्याची आवश्यकता आहे. मोकळ्या मनाने स्वतःच्या चुका स्वीकारा, मान्य करा चुका कितीही झाकल्या तरी आणि कितीही पांघरूण घातल्या तरी लपत नसतात. त्यामुळे आपल्याच माणसांजवळ चुकांचे खोटे समर्थन करण्यापेक्षा आणि स्वतःच्याच तोकड्या बुद्धी आणि हलक्या विचारसरणीचं हसू करून घेण्यापेक्षा चुका मान्य करा. चांगली-वाईट परिस्थिती स्वीकारून, त्यासाठी कोणालाही दोष न देता, कोणावरही खापर न फोडता, आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून हसत-खेळत जवळ या. कुटुंबातील प्रत्येकाला त्याच्या गुण दोषांसहित स्वीकारणे म्हणजेच कुटुंबाचे नेतृत्व करणे होय. इतरांना बदलण्याच्या भानगडीत न पडता स्वतःला बदला. स्वतःला सगळ्यांना सांभाळून, समजावून घेण्याइतपत सक्षम बनवा. आयुष्यात कोण येणार हे वेळ ठरविते परंतु आयुष्यात कोण यायला पाहिजे हे मन ठरविते पण आयुष्यात कोण टिकून राहणार हे स्वभाव ठरवितो मित्र-मैत्रिणींच्या बाबतीत हे लागू होऊ शकते; पण नातेसंबंधांमधील लोकांकरिता आपल्याला पर्याय उपलब्ध नसतो. त्यामुळे जे नातेसंबंध आपल्याशी जन्माला आल्यापासून किंवा लग्नामुळे जोडले गेलेले आहेत, ते चांगल्या पद्धतीने निभावणे क्रमप्राप्त असते. प्रत्येक नातेसंबंध, प्रत्येक व्यक्ती, त्याचा स्वभाव, त्याची वागणूक, विचारधारा यात तफावत असणारच, पण तरी देखील एकमेकांना आपलं समजून, एकमेकांना आधार देऊन कुटुंबरूपी वटवृक्षाचा पाया किती मजबूत करता येईल, याचा आपण प्रयत्न करूयात. कुटुंबातील सदस्य शरीराने कितीही दूर असतील, लांब राहत असतील तरी मनाने त्यांना दूर जाऊ न देणे आपल्या हातात आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्य महत्त्वाचा आहे. जेव्हा नियतीने त्याला तुमच्याशी कोणत्या ना कोणत्या नात्यात गुंफले आहे, तेव्हा तुम्ही त्या नात्याला न्याय देणे लागताच. ज्या व्यक्तींना परमेश्वरानेच तुमच्याशी बांधले आहे, एखादी व्यक्ती जर तुमच्याच कुटुंबाशी बांधली गेली आहे, ती व्यक्ती जर तुमच्या आयुष्याचाच एक भाग आहे, तर त्या व्यक्तीला योग्य तो सन्मान, आदर, योग्य स्थान देण्यात आपल्याला कमीपणा का वाटावा? किंवा कोणतंही नातं टिकविण्यासाठी आपल्याच लोकांपुढे नमतं घेण्यासाठी आपला अहंकार आडवा का यावा, यावर प्रत्येकाने विचार करणे आवश्यक आहे. मोठ्या दिलाने नातेसंबंध टिकविण्यासाठी कुटुंबप्रमुखासह सर्वांनीच आपली जबाबदारी समजून पुढाकार घेणे गरजेचे आहे.

# गणित बिघडवणारं 'गणित'

**एखाद्याची श्रीमंती दाखवण्याचं काम हल्ली घड्याळं करू लागलेली आहेत. जगभरातले अनेक सेलिब्रिटी, धनकुबेरांच्या मनगटांची शोभा वाढवणारी ही घड्याळं इतक्या किमतीची असतात, की ते पाहून आपले डोळे पांढरे व्हावेत! एखाद्याची चांगली वेळ सुरू आहे,' असंच आपण त्यावरून समजायचं. हार्दिक पंड्याच्या कोट्यवधी रुपयांच्या घड्याळामुळे अशा घड्याळांची न्यारी दुनिया कुतूहल वाढवतेय.**

**विशेष**
**सचिन बनछोडे**



काळ आणि वेळ ही माणसासाठी प्राचीन काळापासूनच महत्त्वाची वाटत आलेली गोष्ट आहे. घड्याळं नव्हती त्या वेळी लोक सूर्याच्या स्थितीवरून वेळेचा अंदाज घेत. वाळूची घड्याळंही यासाठी बनवली गेली. सध्या आपण वापरतो त्या मनगटी आणि भिंतीवरच्या घड्याळांचे आद्य पूर्वज युरोपात पंधराव्या शतकात अवतीर्ण झाले, असं मानलं जातं. गुंडाळत जाणाऱ्या स्प्रिंगवर आधारित अशा घड्याळांनी माणसाला वेळेचं अचूक भान करून द्यायला सुरवात केली आणि घड्याळं ही हळूहळू मानवाच्या दैनंदिन जीवनाचा एक भागच बनली. आधुनिक माणसाचं जीवन तर घड्याळाच्या काट्याबरोबरच चालणारं आहे. सध्या वेळ पाहण्यासाठी म्हणूनच नाही, तर इतर अनेक गोष्टींसाठी घड्याळं वापरली जातात. स्टेटस सिम्बॉल' ठरलेली अनेक महागडी घड्याळंही आहेत. अशा घड्याळांची दुनियाही न्यारीच आहे.

**मनगटी घड्याळांचे प्रकार**

मुळातच मनगटी घड्याळांचा जन्म स्टेटस सिम्बॉल' बनण्यासाठीच झाला होता, असं म्हटलं तरी चालेल. याचं कारण म्हणजे १५७१मधे इंग्लंडची महाराणी एलिझाबेथ पहिली हिला रॉबर्ट ड्युडले याने असं पहिलं मनगटी घड्याळ दिल्याचं म्हटलं जातं. खुद्द महाराणीच्या मनगटावर हे घड्याळ असल्यानं त्या वस्तूला किती मोल आलं असेल, याची आपण कल्पना करू शकतो. काही लोकांच्या म्हणण्यानुसार, जगातलं पहिलं मनगटी घड्याळ अब्राहम लुईस-ब्रेगेट याने १८१०मधे नेपल्सची राणी कॅरोलिन म्युरत हिच्यासाठी बनवलं होतं. सुरवातीच्या काळात अशी मनगटी घड्याळं विशेषतः महिलांसाठीच सुंदर ब्रेसलेटप्रमाणे बनवली जात होती आणि पुरुष मंडळी पॉकेट वॉच' म्हणजेच खिशात ठेवण्याची घड्याळं वापरत. १९ व्या शतकाच्या शेवटी एक सोय म्हणून सैनिकांनी मनगटी घड्याळं वापरायला सुरवात केली आणि या घड्याळांबद्दलचा लिंगभेद मावळत गेला. कालौघात मनगटी घड्याळांमधेही अनेक नवे नवे प्रकार येत गेले. १९५०च्या दशकात विजेवर चालणारी घड्याळं आली, तर १९६९ला क्वॉर्टझ घड्याळांचं युग सुरू झालं. १९००मधे रेडिओ कंट्रोल्ड घड्याळं आली, तर २०१३ला अॅटोमिक वॉचही आलं.

**स्वित्झर्लंड लक्झरी घड्याळांचं माहेरघर**

एक वेळ अशी आली, की वेळ पाहणं' इतकाच घड्याळांचा उद्देश राहिला नाही. मनगटावरच्या घड्याळातून माणसाच्या हृदयाच्या ठोक्यांपासून किती पावलं चालणं झालं, इथपर्यंतची आरोग्यदायी' माहिती मिळू लागली. स्वित्झर्लंड हा देश महागड्या, लक्झरी घड्याळांचा माहेरघरच बनलेला आहे. जगभरातले अनेक सेलिब्रिटी, धनकुबेर लोकांच्या हाती मोठ्या ब्रँड्सची महागडी घड्याळं असतात. मनगटावर असं महागडं घड्याळ असणं हे एखाद्याच्या श्रीमंतीचं, प्रतिष्ठेचं लक्षणही बनू लागलं. घड्याळांची हौस असो किंवा नसो, अनेक गर्भश्रीमंत लोक असं घड्याळ हातात बांधून घेऊ लागले. ही घड्याळं वेळ दाखवण्याबरोबरच लोकांना त्यांची श्रीमंती, समाजातलं स्थान दाखवण्याचंही काम करू लागली. अशी काही घड्याळं सर्वसामान्यांना थक्क करणारीच आहेत.

**जगातले महागडे ब्रँड**

जगातल्या सर्वात अव्वल अशा महागड्या घड्याळांच्या ब्रँड्समधे पॅटेक फिलीपी ग्रँडमास्टर खाईम, ब्रेगेट ग्रँड कॉम्प्लिकेशन मेरी अँटोनिएट, जेगर-लेकॉल्त्रे जॉयलेरी, चोपार्ड २०१ कॅरेट वॉच, रोलेक्स यासारख्या अनेक ब्रँड्सचा समावेश होतो. जगातल्या सर्वात महागड्या घड्याळांमधे अव्वल स्थान ग्रॅफ डायमंड्स हॅल्यूसिनेशन'चं आहे. त्याची किंमत ५५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे ४ अब्ज, ८ कोटी, ४९ लाख, ९३ हजार रुपये आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात महागडं घड्याळ आहे ग्रॅफ डायमंड्स द फॅसिनेशन.' ग्रॅफ डायमंड्स द फॅसिनेशनची किंमत आहे ४० दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे २ अब्ज, ९७ कोटी, ८ लाख, ६० हजार रुपये. तिसऱ्या क्रमांकावर आहे पॅटेक फिलीपी ग्रँडमास्टर खाईम.' हे ३१ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे २ अब्ज, ३० कोटी, २१ लाख, ९४ हजार, ८५० रुपयांचं घड्याळ.

**स्पेशल लिलावासाठी घड्याळ**

आता अशा अब्जावधी रुपयांची घड्याळं आहेत, याचा अर्थ, त्यांना खरेदी करणारेही लोक असणारच! उगीचच शोभेसाठी इतक्या महागड्या घड्याळांची निर्मिती होणार नाही! लिलावांमधेही घड्याळांना मोठीच किंमत मिळत असते. २०१९ला स्वित्झर्लंडची लक्झरी वॉच कंपनी पॅटेक फिलीपी'च्या एका घड्याळाला लिलावात तब्बल ३१ दशलक्ष स्विस फ्रँक म्हणजेच सुमारे २२२ कोटी रुपयांची किंमत मिळाली. एखाद्या रिस्टवॉचला मिळालेली ही जगातील सर्वाधिक किंमत होती. हा लिलाव चॅरिटीसाठी करण्यात आला होता आणि मिळालेली सर्व रक्कम समाजोपयोगी कामासाठी दान करण्यात आली. पॅटेक फिलीपी'च्या या ग्रँडमास्टर खाईम ६३०० ए-०१०' घड्याळाची निर्मिती खास लिलावासाठीच झाली होती. यापूर्वी डेटोना रॉलेक्स'च्या नावे जगातलं सर्वात महागडं घड्याळ' असा किताब होता. २०१७ला या घड्याळाला १७.८ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे १२७ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आलं होतं.

**सेलिब्रिटींकडे कोट्यवधींची घड्याळं**

अनेक सेलिब्रिटी महागडी घड्याळं घेऊन चर्चेत येत असतात. फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोकडे महागड्या मोटारींचा जसा ताफा आहे, तसाच महागड्या घड्याळांचाही संग्रह आहे. त्याच्याकडच्या एका रोलेक्स घड्याळाची किंमत ३ कोटी ७२ लाख रुपयांपेक्षाही अधिक आहे. हे घड्याळ १८ कॅरेट व्हाईट गोल्डने बनवलेलं असून त्यावर ३० कॅरेटचे हिरे जडवलेले आहेत. विराट कोहलीचं रोलेक्स डेटोना', कायली जेनरचं १८ कॅरेट व्हाईट गोल्डचं पॅटेक फिलीपी', ड्रेकचं रिचर्ड मायली आरएम ६९', जे झेडचं पॅटेक फिलीपी' घड्याळही चर्चेत आलं. सध्या क्रिकेटपटू हार्दिक पंड्याही महागड्या घड्याळांमुळे चर्चेत आला आहे. आयसीसी टी-ट्वेन्टी वर्ल्डकप'नंतर आपले क्रिकेटपटू अगदीच हात हलवत परत आले नाहीत, हे हार्दिक पंड्याच्या हातावरून दिसून आलं. त्याच्याकडची दोन महागडी घड्याळं मुंबई विमानतळावर कस्टम विभागाच्या अधिकाऱ्यांनी जप्त केली. त्यांची किंमत ५ कोटी रुपये होती, असं म्हटलं गेलं. मात्र खुद्द हार्दिकने घड्याळ दीड कोटी रुपयांचं असल्याचा खुलासा सोशल मीडियातून केला. दीड कोटी रुपयांमधे काय काय येऊ शकतं. याची कल्पना आपण करू शकतो. अशा वेळी नुसतं दीड कोटींचं घड्याळच एखादी व्यक्ती घालते म्हटल्यावर आपल्या भुवया उंचावणारच! मात्र उच्चभ्रू समाजात आता अशी घड्याळं घालणं प्रतिष्ठेचंच लक्षण मानलं जातं. एखाद्याची चांगली वेळ सुरू आहे,' असंच आपण त्यावरून समजायचं.

# जंगलावर निस्सीम प्रेम करणाऱ्या तुलसी गौडा

**...२०२०च्या पद्म पुरस्कारांचा वितरण सोहळा ८ नोव्हेंबरला दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात पार पडला. या सोहळ्यात अनवाणी पायांनी पद्मश्री पुरस्कार स्वीकारायला आलेल्या तुलसी गौडा यांची चर्चा सगळीकडे सुरू आहे. जंगलातली बाई असणं हे फक्त माणूस असण्यापेक्षा कितीतरी पटीनं जास्त इंटरेस्टिंग आहे हे गौडा यांच्याकडे बघितल्यावर कळतं.**

**आज-काल**
**रेणुका कल्पना**



जंगलाची भाषा येणारी जंगलातली बाई म्हणजे तुलसी गौडा. जंगलाला स्वतःची ओळख असते. जंगलात काम करून त्यांना कळलेल्या गोष्टी नुसत्या माहितीवर आधारित नाहीत. त्यातून जंगलाबद्दलचा दृष्टिकोनही कळतो.

जंगल का आदमी सीखता है
पगडंडियों से चलना,
पौं से विकसित होना,
बारिश से नाचना
और गीत
खुखयिों की तरह
उग आते हैं खुद ब खुद।

आदिवासी कवयित्री जेसिंता केरकट्टा यांच्या जंगल कहता है' या कवितेच्या या ओळी. चालण्यासारखी अगदी नैसर्गिक गोष्टही जंगलातला माणूस जंगलाकडूनच शिकतो. त्याचं नाचणं, गाणंही इथेच बहरतं. जंगल काय सांगतंय हे ते नुसत्या कानांनीच नाही तर डोळ्यांनी, नाकाने, स्पर्शानेही, अनेकदा चवीनेही ऐकत असतात. पायाखालच्या जमिनीचा ओलावा अनुभवूनही जंगल काय सांगतंय हे त्यांच्या अनवाणी पायांना कळत असतं.

**विसाव्या वर्षी झाडांचं संगोपन**

२०२०च्या पद्म पुरस्कारांचा वितरण सोहळा ८ नोव्हेंबरला दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात पार पडल्यापासून याच अनवाणी पायांनी पद्मश्री पुरस्कार स्वीकारायला आलेल्या तुलसी गौडा यांची चर्चा सुरू आहे. जंगलातली बाई असणं हे फक्त माणूस असण्यापेक्षा कितीतरी पटीनं जास्त इंटरेस्टिंग आहे हे गौडा यांच्याकडे बघितल्यावर कळतं. मला जंगलाची भाषा येते' हे त्या कानडी भाषेत, हलक्की आदिवासींच्या खास लहेजात उच्चारत असल्या तरी त्यांचा देह ती जंगलाचीच भाषा बोलत असतो. वयाच्या विसाव्या वर्षी होन्नाली गावातल्या अगसूर नर्सरीत झाडांच्या संगोपनाचं काम त्यांनी सुरू केलं होतं. १२ वर्षांपूर्वी त्या निवृत्त झाल्या तेव्हा आत्तापर्यंत त्यांनी ४०-५० हजार झाडांचं संगोपन केलं असेल, असं वन विभागाचे अधिकारी म्हणतात.

**नोंद नसलेला हलक्की समुदाय**

पद्मश्री घेण्यासाठी जंगलातून अनवाणी पायांनी, सुती साडी अंगाला गुंडाळून गौडा राष्ट्रपती भवनात आल्या हाच चर्चेचा विषय बनला. त्यांचा हा पेहराव विशेषतः गळ्यातले पिवळ्या मण्यांच्या माळांचे सहा पदर घातलेल्या गौडा यांना पाहिलं की कधीतरी गुगलवर पाहिलेल्या कोणत्या तरी आफ्रिकन आदिवासी महिलांची आठवण येते. हलक्की समुदायासोबतच उत्तर कर्नाटकातल्या सिद्दी, कुणबी असे अनेक आदिवासी आफ्रिकेतल्या मसाई मारा समुदायासारखे दिसतात. तुलसी गौडा यांना पद्मश्री मिळण्याआधीही अनेकदा या समुदायातली माणसं प्रकाशझोतात आलीयत. गाण्यासाठी पद्मश्री मिळालेल्या हलक्कीच्याच सुक्री बोमागौडा, हंपी युनिवर्सिटीतल्या लोकविज्ञान विभागाकडून सन्मानित केले गेलेले हलक्की वैद्य हनुमनाथन गौडा, सिद्दी समुदायातले पहिले आमदार शांताराम अशी अनेक उदाहरण घेता येतील. तरीही भारत सरकारच्या दस्तऐवजात त्यांची नोंद नाही. अनुसूचित जमातींच्या यादीत नाव मिळवण्यासाठी कित्येक वर्षे त्यांचा लढा चालू आहे. गौडा यांच्या निमित्ताने तरी त्याला गती येईल.

**१४ वर्ष वन विभागात**

जंगलात फिरून या झाडांच्या बिया आणायच्या, बी बँकेत टाकायच्या, झाडाचा हंगाम आला की त्या कुंडीत पेरायच्या. रोपाचं संगोपन करायचं आणि नंतर लाडाकोडात वाढवलेलं रोप जंगलात जाऊन लावायचं. या कामासाठी गौडा यांना कर्नाटक वन विभागाकडून रोजंदारीवर पगार मिळायचा. ज्या दिवसाची हजेरी, त्या दिवसाचा पगार. नंतर कंत्राट पद्धतीनं काम केलं आणि निवृत्त होण्याआधी १४ वर्ष वन विभागाकडेच कायमस्वरूपी नोकरी केली. आजही त्या जंगलात जातात आणि दुर्मीळ बिया मिळाल्या तर वन विभागाच्या बी बँकेत आणून टाकतात.

**तुलसींच्या ज्ञानाची नोंद नाही**

आंबा, फणस ही झाडं तर नेहमीच लावायचो. निलगिरी, सागवान, शिसम, बाभूळ, आईन अशी कितीतरी झाडं मी लावली' गौडा सांगतात. वयाच्या १२ व्या की १३ व्या वर्षी लग्न करून त्या होन्नाली गावात आल्या हेही त्यांना आठवत नाही. आठवते ती फक्त पोटातली भूक. त्या तीन वर्षांच्या असताना वडिलांचं निधन झाल्यानंतर ही भूकच आयुष्यभर पोटात होती. त्या भुकेनं कधी शाळेचं तोंडही पाहू दिलं नाही. पण त्या अशिक्षितपणाचा परिणाम त्यांच्या जंगलाबद्दलच्या माहितीवर झाला नाही. जंगलातलं कोणतं झाड कधी फलधारण करतं आणि कोणत्या दिशेला बिया फेकतं हेही त्यांना माहीत असतं. त्यामुळेच दुर्मीळ झाडांच्याही दर्जेदार बिया शोधणं त्यांना अवघड जात नाही. जंगलाची आई झालेल्या या बाईला झाडांची आई कोणती ते नेमकं कळतं. जंगलातलं एखादं नव्याने उगवलेलं झाड कोणत्या झाडांच्या बियांपासून आलंय हे त्या सांगू शकतात. आपण दाखवा म्हटलं तर हात धरून नेऊन झाडासमोर उभं करू शकतात. पद्मश्री मिळाला असला तरी आत्तापर्यंत त्यांना असलेल्या ज्ञानाची कुठेही नोंद झालेली नाही.

**एन्सायक्लोपेडिया ऑफ फॉरेस्ट**

जंगलाबद्दल एवढं कसं कळतं हे त्यांना शब्दात मांडता येत नाही. मला जंगलाची भाषा येते', एवढंच त्या म्हणतात. जंगलाला स्वतःची ओळख असते. आपल्या या ओळखीसह त्याच्या आतल्या सगळ्या गोष्टींची ओळख जंगल ताजी टवटवीत ठेवत असं, एवढंच गौडा यांना कळतं. त्यांना एन्सायक्लोपेडिया ऑफ फॉरेस्ट' म्हणजे जंगलाचा ज्ञानकोश म्हणतात ते उगाच नाही. जंगलात काम करून त्यांना कळलेल्या गोष्टी नुसत्या माहितीवर आधारित नाहीत. त्यातून जंगलाबद्दलचा दृष्टिकोनही त्यांच्या मनात आहे. जंगल नसेल तर तापमान वाढेल हे त्या सांगतात, तेव्हा सध्या हवामान बदलासाठी लढणाऱ्या आंदोलकांपेक्षा वेगळं काय म्हणतात? जंगलातल्या माणसांना राजकारण कळत नाही, असं आपल्याला वाटतं. पण जंगलातली माणसं जंगलातल्या लांडग्यांनाही पुरती ओळखून असतात हे विसरून चालणार नाही. कोणत्या लांडग्याने कशी लबाडी केली होती आणि आपल्या किती लोकांची शिकार केली होती हा इतिहास शाळा न शिकलेल्या जंगलातल्या लोकांना तोंडपाठ असतो.

# 'दीपपर्व २०२१' विशेषांक सर्वदूर, सर्वव्यापी

माजलगाव : वर्तमान माध्यम समुहाच्या 'दीपपर्व २०२१' विशेषांकाचे सर्वव्यापी, सर्वदूर स्वागत झाले आहे. समाजकारण, राजकारण, उद्योग, आरोग्य, सहकार, पत्रकारिता आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी 'दीपपर्व'च्या मांडणी आणि दर्जाचे कौतुक केले आहे. कर्तृत्ववान व्यक्तींचा 'दीपपर्व'ने आढावा घेतला. हा उपक्रम वाखाणण्याजोगा आणि कौतुकास्पद असल्याच्या प्रतिक्रिया 'वर्तमान'च्या वाचकांनी नोंदविल्या आहेत. 'दीपपर्व २०२१' दिवाळी अंक अखिल भारतीय वारकरी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांना 'वर्तमान'चा 'दीपपर्व२०२१' दिवाळी अंक भेट देताना सल्लागार संपादक चंद्रकांत शेजुळ, जिल्हा परिषदेचे सभापती कल्याण आबुज, जयदत्त नरवडे, भाजपा नेते रमेशराव आडसकर, भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राऊत, माजलगाव खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष निवृत्ती सोळंके, माजलगाव पंचायत समितीचे सदस्य शिवाजीराव डाके, भाजपा युवा नेते बाबरी मुंडे, धनराज मुंडे, उपविभागीय अधिकारी निलम बाफना, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे, हिंदवी स्वराज्य अर्बनचे सुरेश मोरे आदी मान्यवरांना भेट दिला आहे.











## कोरोनाच्या नव्या अवताराची लक्षणे काय?

कोरोना व्हायरसच्या नव्या व्हेरीएंटनं जगाची धाकधुक पुन्हा वाढवली आहे. दक्षिण आफ्रिकेत आढळून आलेल्या या व्हेरीएंटच्या पार्श्वभूमीवर जगभरातील सर्वच देशांनी उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. ओमिक्रॉन व्हेरीएंटची पुष्टी झाल्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेनंही चिंता व्यक्त केली आहे. नव्या व्हेरीएंट समोर आल्यानंतर अमेरिका आणि ऑस्ट्रेलियासह अनेक देश दक्षिण आफ्रिकेतून येणाऱ्या प्रवाशांबाबत सतर्क झाले आहेत. दक्षिण आफ्रिकेहून येणाऱ्या प्रवाशांवर निर्बंध लादण्यात आले आहेत. अशातच सर्वांच्या मनात हाच प्रश्न आहे की, ओमिक्रॉन व्हेरीएंट आहे तरी काय आणि त्याची लक्षण नेमकी काय?

काय आहेत लक्षणं?

दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रीय संचारी रोग संस्थान




(एनआयसीडी)च्या वतीनं सांगण्यात आलं आहे की, ओमिक्रॉन व्हेरीएंटची लागण एखाद्या व्यक्तीला झाली तर त्या व्यक्तीमध्ये फारशी काही वेगळी लक्षण दिसून येत नाहीत. एनआयसीडीनं दिलेल्या माहितीनुसार, असंही सांगितलं जात आहे की, डेल्टाप्रमाणेच ओमिक्रॉननं बाधित झालेल्या व्यक्ती एसिम्टोमेटिक होत्या. अशातच एनआयसीडीनं असं मानलं जातंय की, ओमिक्रॉननं बाधित व्यक्तीमध्ये फारशी वेगळी लक्षण दिसत नाहीत.

ओमिक्रॉनची सौम्य लक्षणं

एएनआयच्या वृत्तानुसार, या व्हेरीएंटमुळे सौम्य आजार होण्याची शक्यता असल्याचं दक्षिण आफ्रिकेतील मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्ष एंजेलीक कोएट्जी यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या की, 'या आजाराचे सौम्य लक्षणं दिसत आहे. यामध्ये स्नायू दुखणे, थकवा जाणवणे, अथवा दोन दिवस आजारी राहण्यासारखी लक्षणं दिसत आहेत. आतापर्यंत या व्हेरीएंटमुळे वास न येणं यासारखी समस्या कुणामध्येही जाणवली नाही. संक्रमित व्यक्तींमध्ये थोड्याफार प्रमाणात कफ होण्याची शक्यता आहे. ओमिक्रॉनने संक्रमित झालेले रूग्ण घरातच उपचार घेत आहेत.'

कशी केली जाते तपासणी?

ओमिक्रॉनच्या तपासणीबाबत सांगताना डब्लूएचओनं सांगितलं की, सध्या SARS-CoV-2 PCR हा व्हेरीएंट पकडण्यात सक्षम आहे. नव्या व्हेरीएंटच्या पार्श्वभूमीवर भारतासोबत इतर अनेक देशही सतर्क झाले आहेत. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेहून येणाऱ्या प्रवाशांना क्वॅरंटाईन करण्यात येणार आहे. तसेच त्यांनी चाचणी करणं बंधनकारक असणार आहे.



# ऊस उत्पादकांसाठी सोळंके कारखाना वरदान

## केवळ एका महिन्यात १ लाख ६१ हजार मेट्रीक टन गाळप

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तेलगाव (ता.धारूर) येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याने केवळ ३१ दिवसांमध्ये १ लाख ६१ हजार मेट्रीक टन ऊसाचे गाळप करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात ऊसाचा पहिला हप्ता प्रतिटन २१०० रूपये वर्ग करण्याचा मानही सोळंके कारखान्याला मिळाला आहे. दरम्यान, सोळंके कारखाना माजलगाव मतदार संघातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.

एकीकडे राज्यातील साखर कारखाने अडचणीत असताना आणि ऊसाला हमीभाव न मिळत असताना माजलगाव विधानसभा मतदारसंघातील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याची घोडदौड सुरू आहे. फक्त ३१ दिवसांच्या गाळपात १ लाख ६१ हजार मेट्रीक टन गाळप पूर्ण करणाऱ्या या कारखान्याने ११ लाख ५० हजार मेट्रीक टनाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे.



ऊसाचा पहिला हप्ता प्रतिटन २१०० रूपये शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करणारा पहिला कारखाना ठरला आहे. माजलगाव मतदारसंघातील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना यंदा ३० वे गाळप करत आहे. कारखान्याच्या शाश्वत विश्वासामुळे मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलला आहे. संपूर्ण मतदारसंघात तब्बल २५ लाख मेट्रीक टन ऊस लागवड झाली आहे. भरपूर पाणी, मेहनत करणारा शेतकरी आणि लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्यासारखा शेतकऱ्यांचे हित जोपासणारा कारखाना याची सांगड घालत मतदारसंघाची वाटचाल सुरू आहे. यंदा तब्बल साडेअकरा लाख मेट्रीक टन ऊसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे. लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन धैर्यशील सोळंके यांनी ऊसापोटी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रतिटन २१०० रूपये जमा करण्याची घोषणा केली आहे. मराठवाड्यासह राज्यात २१०० रूपये पहिला हप्ता देणारा हा कारखाना अव्वल ठरत आहे. सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याने ३१ दिवसांमध्ये एक लाख ६१ हजार मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले आहे. एका दिवसामध्ये ५६०० मेट्रीक टन गाळप झाले आहे. एकूण १ लाख २९ हजार १५० क्विंटल साखरेचे उत्पादन झालेले आहे. सरासरी साखर उतारा ८.८५ एवढा आहे.

मतदारसंघातील संपूर्ण ऊस गाळप झाल्याशिवाय कारखाना बंद केला जाणार नाही असे प्रयत्न कारखान्याचे सुरू आहेत. माजलगाव सहकारी साखर कारखान्याच्या या घौडदोडीमुळे शेतकरी समाधानी झाला आहे. रास्त भाव, वेळेवर पेमेंट यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास द्विगुणीत झाला आहे. लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याने नेहमी शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवले आहे. ऊसाला जास्तीत जास्त भाव देण्यासाठी गाळपासह उपपदार्थ निर्मितीवरही भर दिला आहे. या साखर कारखान्याने डिस्टीलरी उत्पादनातही मोठी झेप घेतली आहे. आतापर्यंत १६ लाख २५ हजार ६६६ लिटर स्पिरिट तयार केले आहे. १४ लाख ७१ हजार २५० लिटर इथेनॉल उत्पादन केले आहे. तर ७५ लाख ५५ हजार २०० युनिट वीज निर्मिती केली आहे. यातून मिळणारा प्रत्येक रूपये शेतकऱ्यांच्या पदरात टाकण्याचा प्रामाणिक प्रयत्न सोळंके कुटुंबाचा आहे.



### योग्य नियोजनामुळे कारखान्याची उभारी

लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याने कर्मचाऱ्यांसह शेतकऱ्यांनाही शिस्त लावली आहे. प्रत्येक महिन्यात गाळप होणारा ऊस नियमाप्रमाणे लागवड करण्यात आला आहे. त्यामुळे पुढच्या वर्षी साखर उतारा वाढणार आहे. ऊसाचे वय वाढले तर साखर उतारा कमी होतो. म्हणून प्रत्येक दिवसाची नोंद आणि गाळप यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळेच कारखान्याचा नावलौकीक वाढत आहे. याचे सर्व श्रेय आमदार प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाला आणि चेअरमन धैर्यशिल सोळंके यांच्या कार्यक्षमतेला द्यावे लागेल.

# तहसिलदार मनाळे ॲक्शन मोडमध्ये

## मुरूम उत्खनन प्रकरणी कारवाई; ५ ट्रॅक्टर, एक ब्रेकर जप्त

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शासनाचा महसूल बुडवून रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या मुरमाचे अवैध उत्खनन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करत ५ ट्रॅक्टर, एक ब्रेकर ताब्यात घेतले आहे. ही कारवाई तहसिलदार वर्षा मनाळे यांनी सोमवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास पुंगणी येथे केली. अवैध उत्खनन करून एकदरा ते नांदलगाव रस्त्याच्या कामासाठी वापर करण्यात येत होता.

माजलगाव तालुक्यातील बाळराजे कन्स्ट्रक्शनमार्फत सोमवारी करण्यात येणाऱ्या एकदरा ते नांदलगाव या आठ ते दहा किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी अवैध मुरमाचे उत्खनन करण्यात येत असल्याची माहिती तहसिलदार मनाळे यांना मिळाली. त्यांनी पाहणी केली. पुंगणी येथील गट नंबर ११ मधून अवैध उत्खनन सुरू असल्याचे त्यांना दिसल्यानंतर त्यांनी तात्काळ तेथील ५ ट्रॅक्टर, एक मुरूम काढण्यासाठी वापरण्यात येणारे ब्रेकर ही वाहने ताब्यात घेतली. तहसिलदारांची गाडी येत असल्याचे पाहून घटनास्थळा वरील एक पोकलेन, एका जेसीबी चालकाने घेऊन जात पलायन केले. पुंगणी येथील गट नंबर ११ मध्ये मोठमोठे खड्डे खोदलेले आढळून आले असून अंदाजे १०० ब्रासपेक्षाही अधिक मुरमाचे उत्खनन केल्याचे अधिकाऱ्यांना दिसून आले. घटनास्थळावर २० ब्रास मुरूम असून वरील वाहनांसह तोही महसूल विभागाच्या अधिकाऱ्याने ताब्यात घेतला. कारवाईत नायब तहसिलदार अशोक भंडारी, तलाठी एस.एल.पराड, आर.व्ही. मडकर आदी सहभागी होते. माजलगावच्या प्रशासनापुढे आता वाळूबरोबरच मुरुम उत्खनन रोखण्याचे आव्हान आहे.



### 'संबंधित गुत्तेदाराला दंड आकारणार'

प्रत्यक्ष पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात मुरमाचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. उत्खनन केलेल्या संबंधित खड्ड्याचे मोजमाप करून संबंधित गुत्तेदारावर दंड आकारण्यात येईल, अशी माहिती माजलगावच्या तहसिलदार वर्षा मनाळे यांनी दिली.

### निलंबनाची कारवाई करा : दत्ता कांबळे



सदरील अवैध मुरूम उत्खनन हा स्थानिक तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या संगनमताने झाला असून, यांच्यात दोन्ही अधिकारी दोषी असल्याने त्यांचे निलंबन करण्यात यावे तसेच मागासवर्गीयांच्या अतिक्रमित गायरान जमिनीवर डोळा टाकाल तर याद राखा गाठ माझ्याशी आहे, असे आव्हान काँग्रेस अनुसुचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा संजय गांधी निराधार समितीचे सदस्य दत्ता कांबळे यांनी केले आहे.



# सत्यशोधक विचार आचरणात आणा

## उद्योजक सोमनाथ चांदमारे यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : महात्मा ज्योतिबा फुले यांचे सत्यशोधक विचार समाजाने आचरणात आणण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक सोमनाथ चांदमारे यांनी पात्रुड येथे काढले. ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त बोलत होते.

सामाजिक क्रांतीचे जनक, मराठी कवी, लेखक, थोरसमाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १३१ व्या स्मृतिदिनानिमित्त पात्रुड येथील बुद्ध विहारांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन कार्यक्रम करण्यात आला. नागरिकांनी महात्मा ज्योतिबा फुले अमर रहे आशा घोषणा देऊन मानवंदना देण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा युवा उद्योजक सोमेश्वर चांदमारे, प्रशांत चांदमारे, बळीराम ढगे, भालचंद्र ढगे, सुमित चांदमारे, बुद्धप्रेम चांदमारे, नामदेव चंद्रमोरे, अशोक ढगे यांची उपस्थिती होती.

# राज्यात पुन्हा पावसाळी इशारा?

▶ प्रतिनिधी

मुंबई : राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान गुजरात, महाराष्ट्र, गोवा राज्यांमध्ये अवकाळी पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यात २९, ३० नोव्हेंबरला कोकणात आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात मेघ गर्जनेसह जोरदार पावसाचा व जोरदार वाऱ्यांचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. थंडी कमी झाली असून हवामानात मोठे बदल होत आहेत.












आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.